कार्यालयीन पत्र व्यवहार

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

**प्रधान कार्यालय** : "मुंबै बँक भवन", २०७, डॉ.डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

---

जा.क्र.मुंबै बँक/कर्ज विभाग/फा-कार्यालयीन सुचना/२०१६-१७/ ७१८ दिनांक :- ३१/०५/२०१६

## कार्यालयीन सुचना

सर्व शाखाव्यवस्थापक तसेच विभागीय व्यवस्थापकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र सरकारने सुमारे ४००० नविन टॅक्सी करीता परवाने वाटप करणेसंबधी कार्यवाही सुरु केल्याने नविन परमिट धारकांची व्यवसायिक टॅक्सी खरेदी संबधी कर्ज मागणी बँकेकडे येण्याची शक्यता विचारात घेऊन, प्रचलित चारचाकी व्यवसायिक वाहन कर्ज धोरणामध्ये दि.१७/०५/२०१६ चे मा.संचालक मंडळ सभा ठराव क्रमांक ५ नुसार, खालील प्रमाणे अंशत: बदल करणेत आला आहे. त्याची कृपया नोंद घ्यावी.

| प्रचलित कर्ज धोरणातील तरतूद | करणेत आलेला बदल |
|---|---|
| १) प्रचलित वाहन खरेदी कर्ज धोरणात कर्ज मागणी कर्ज मंजूरीचे अधिकार संबंधीत विभागीय नियंत्रण सभेस असून, मंजूरी पत्रातील अटींची पूर्तता केलेनंतर संबंधीत डिलर्सला पे ऑर्डरद्वारे कर्ज रक्कम अदा केली जाते. | १) प्रचलित वाहन कर्ज मंजूरी व वितरण प्रक्रिया जलद होण्याचे दृष्टीने फक्त व्यवसायिक टॅक्सी खरेदी, वाहन कर्ज मंजूरीचे अधिकार, संबंधीत विभागीय व्यवस्थापकांना प्रदान करणेत येत असून, प्रत्यक्ष कर्ज वितरण कर्जदाराच्या निवास स्थाना नजीकच्या शाखेतून करावे लागेल. प्रत्येक महिना अखेरील नियंत्रण समिती सभेस कर्ज मंजूरी संबंधीची माहिती, माहितीस्तव सादर करणे आवश्यक राहील.<br>तसेच कर्ज मंजूरीची रक्कम संबंधित अधिकृत डिलर व अन्य संबंधितांना (इतर ॲसेसरी बसविणाऱ्या डिलर्स यांना) विभागून द्यावी लागेल. |
| २) प्रचलित कर्ज धोरणात, व्यावसायिक वापराचे चारचाकी वाहनाकरीता मुळ किंमत (बॉडी बिल्डींग सह) + रजिस्ट्रेशन चार्जेस + सी.एन.जी. किटचा खर्च + मीटर (फक्त टॅक्सीकरीता) यांचे ८०% रकमे इतका कर्ज पुरवठा केला जाईल. | २) व्यवसायिक वापरासाठीचे चारचाकी वाहनाकरीता मुळ किंमत (बॉडी बिल्डींग सह) + रजिस्ट्रेशन चार्जेस + सी.एन.जी. किटचा खर्च + मीटर (फक्त टॅक्सीकरीता) + पेटींग + गार्ड कॅरीअर + विमा हप्ता यांचे एकूण किंमतीचे ९०% इतका व कमाल रु.५.०० लाखापर्यंत, कर्ज पुरवठा, द.सा.द.शे.१०.७५% व्याजदराने, ६० समान मासिक परतफेडीचे हफ्त्यांनी (इ.एम.आय. पध्दतीने) केला जाईल. |
| ३) प्रचलित कर्ज धोरणानुसार चारचाकी वाहन कर्जासाठी, २ जामिनदार (त्यातील एक आयकर पात्र पगारदार) घेणे आवश्यक आहे. | ३) सदरचे कर्जासाठी एक जामिनदार (व्यवसायिक परवाना टॅक्सीधारक) घेणे आवश्यक राहील. तसेच ग्रुप कर्ज असल्यास, एक परवाना टॅक्सीधारक, कमाल २ कर्जदारांना, जामिनदार म्हणून ग्राहय धरता येईल. |

| | |
|---|---|
| | ४) वाहनाची नोंदणी झालेनंतर, वाहनाचे मुळ आर.सी.बुक व वाहन परवान्याची (परमिट) प्रत (मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्जासंबंधी बोजा नोंदीसह, डुप्लीकेट चावी व विमा पॉलिसी शाखा दफ्तरी ठेवणे बंधनकारक राहील.<br><br>५) कर्जदाराचे उत्पन्नासंबंधी सेल्फ डिक्लेरशन तसेच कर्ज परतफेडीसंबंधी अहवाल सादर करणे आवश्यक राहील.<br><br>६) टॅक्सी परवानाधारक कर्जदार / जामिनदारांना, बँकेत बचत खाते उघडून के.वाय.सी. नुसारची कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. |

उपरोक्त बदल केवळ व्यवसायिक परवानाधारक टॅक्सी खरेदीसाठीचे कर्ज धोरणा पुरताच मर्यादित असून इतर वाहन कर्जासंबधी कर्ज धोरणात कोणताही बदल झालेला नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**व्यवस्थापक**
**(कर्जे व अग्रिम)**

**प्रति,**

१) विभागीय व्यवस्थापक
विभागीय कार्यालय क्र.

२) शाखा व्यवस्थापक
--------------------- शाखा

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :-**

१) मा.अध्यक्ष / मा.उपाध्यक्ष यांचे स्विय सहाय्यक

२) मा.सरव्यवस्थापक यांचे स्विय सहाय्यक

३) मा.सहा.सरव्यवस्थापक / व्यवस्थापक
संगणक विभाग विभाग केंद्र कार्यालय

**व्यवस्थापक**
**(कर्जे व अग्रिम)**

Z:\prasad\pg2414.doc